प्रेसनोट दि.२९/०८/२०१९

## बिबवेवाडी पोलीस ठाणे,पुणे शहर

## पुणे मनपा सफाई कामगाराचा प्रामाणिकपणा सापडलेले अंदाजे दिड किलो चांदिचे दागिने पोलीस ठाणे येथे केले जमा

आज दि.२९/०८/२०१९ रोजी सकाळी ०६/०० वा चे सुमारास पुणे महानगर पालीकेचे सफाई कर्मचारी नामे सौ. कस्तुराबाई गोरख हनवते वय-५० वर्षे रा.पर्वती दर्शन पुणे या आपले नेहमी प्रमाणे त्यांना नेमुण दिलेल्या परिसरामध्ये कोठारी ब्लॉक बिबवेवाडी येथील रोडवरील साफ सफाई करीत असताना त्यांनी एक प्लॅस्टीकची पिशवी उचलुन त्यांच्या जवळील प्लॅस्टीकच्या बकेटमध्ये टाकली असता त्यांना सदरची पिशवी टाकल्यानंतर धातु पडल्यासारखा आवाज आल्याने त्यांनी सदरच्या पिशवी मध्ये पाहिले असता त्यांना पिशवीमध्ये अंदाजे दिड किलो चांदीचे गणपतीचा साज असलेले दागीने मिळुन आल्याने त्यांनी सदर बाब त्यांचे सफाई निरीक्षक श्री सचिन पवार पुणे मनापा यांचे निदर्शनास आणुन दिल्याने त्यांनी प्रथम पोलीस ठाणेस संपर्क करुन त्याची माहिती देवुन ते स्थानिक नगरसेवीका मा.मानसीताई देशपांडे यांचेसह पोलीस ठाणेस येवुन सदर पिशवी पोलीसांच्या ताब्यात दिली असुन सदर दागीन्यां बाबत बिबवेवाडी पोलीस ठाणेचे सपोनि श्री पावसे हे अधिक तपास करीत आहेत.

सफाई कर्मचारी सौ. कस्तुराबाई हनवते यांनी वरीलप्रमाणे अंदाजे किंमत ९०,०००/- रुपये किंमतीचे अंदाजे दिड किलो चांदीच्या वस्तु बाबत कोणताही मोह न दाखविता अतिशय प्रामाणिकपणे सदरचे दागिने पोलीसांकडे सुपूर्त केल्याबाबत त्यांचा बिबवेवाडी पोलीस स्टेशन येथे मा.सौ.मानसीताई देशपांडे स्थानिक नगरसेवीका, श्री.रामविलास माहेश्वरी यांचे उपस्थितीत मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.मुरलीधर करपे यांचे हस्ते पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देवुन प्रामाणिकपणाचे वर्तन केल्याबाबत सत्कार करण्यात आला असुन सर्वानी असे प्राणिकपणे कामकाज करावे असे अव्हाण केले आहे. तसेच त्यांचे सफाई निरीक्षक श्री सचिन पवार सहाकारी डिंबळे,शब्बीर शेख, विनोद साबळे, श्रीधर कांबळे व महेश हरनावळ यांचेही अभिनंदन केले.

